मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहिराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.com | » पुणे, पिंपरी-चिंचवड | » मंगळवार, दि. 26 ऑगस्ट 2025 | पान- 1

# न्यायालय इमारतीचे बांधकाम संथ गतीने

## आत्तपर्यंत केवळ 40 टक्के बांधकाम पूर्ण; फेब्रुवारीपर्यंत काम पूर्ण करण्याचे लक्ष्य

**पिंपरी | प्रतिनिधी**

मोशी येथील जिल्हास्तरीय न्यायालयाचे बांधकाम संथगतीने सुरू असून, आत्तपर्यंत केवळ 40 टक्के बांधकाम पूर्ण झाले आहे. 3 मार्च 2024 रोजी येथील इमारतीच्या कामाचे भूमिपूजन झाले होते. आता जवळपास दीड वर्ष उलटूनदेखील कामाने वेग घेतलेला दिसून येत नाही. प्रत्यक्षात फेब्रुवारीत ते काम पूर्ण होणे अपेक्षित होते. मात्र, कामाची गती लक्षात घेता, उरलेल्या 60 टक्के कामाला आणखी वर्षे उजाडेल.



दरम्यान, मध्यंतरी निधीअभावी रखडलेले कामाला ठेकेदाराला सार्वजनिक विभागाकडून कानउघाडणी करण्यात आली. मोशी येथील सेक्टर नंबर 14 मध्ये 15 एकर जागेमध्ये पिंपरी-चिंचवड न्याय संकुलाच्या इमारतीचे चौथ्या टप्प्याचे काम सुरू आहे. या ठिकाणी पहिल्या टप्प्यात 25 न्यायालये उभारण्यात येणार आहे.

दरम्यान, डिसेंबर 2025 पर्यंत हे काम पूर्ण होण अपेक्षित असताना त्यानंतर फेबुरवारीची तारीख देण्यात आली. मात्र, तीदेखील गाठणे अवघड आहे. मध्यंतरी या बांधकामास अडथळा आला होता. यानंतर ज्येष्ठ वकील आणि पिंपरी-चिंचवड ॲडव्होकेटस् असोसिएशनच्या माध्यमातून मंत्रालयातून पाठपुरावा करण्यात आला.

त्यानुसार वित्त व निधी विभागाकडून सकारात्मक प्रतिसाद देण्यात आला आहे. तसेच, सार्वजनिक विभागाकडूनदेखील कामाची गती वाढविण्याबाबत या शिष्टमंडळास आश्वासन देण्यात आले. नेहरुनगर येथील महापालिकेच्या इमारतीत न्यायालयाचे कामकाज सुरू आहे.

मात्र, न्यायालयाच्या हक्काच्या जागेसाठी गेल्या अनेक वर्षांपासून वकील संघटना आणि बार असोसिएशन पाठपुरावा करत आहे. सध्याच्या जागेसाठी जवळपास साडेसात लाख रुपये महिन्याकाठी भाडे भरावे लागत आहे. ते भाडे सार्वजनिक बांधकाम भरते. तर, दुसरीकडे इमारतीचे काम लवकर होत नसल्याने आणखी काही महिने भाडे भरण्याची वेळ येणार आहे.

### अशी आहे स्थिती

- » एकूण क्षेत्र: 15 एकर
- » बांधकाम: तळमजला, 4 मजले
- » सध्याचे काम: 40 टक्के
- » कामाची मुदत: 24 महिने
- » अंदाजे रक्कम: 124 कोटी
- » अंतिम तारीख: फेब्रुवारी 2026

"न्यायालयाच्या इमारतीचे काम सुरू आहे. बांधकामाची गती वाढवली असून, वेळेत काम पूर्ण होण्यासाठी मनुष्यबळात वाढ करण्याबात कळवले आहे. वेळेत काम पूर्ण होण्याबाबत आमचे प्रयत्न सुरू आहेत.

**- संजय नगराळे, उपअभियंता, सार्वजनिक बांधकाम.**

# गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर विसर्जन घाट तयारीचा शत्रुघ्न काटे यांच्याकडून आढावा

**पिंपरी | प्रतिनिधी**

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर नागरिकांच्या सुरक्षेसाठी नदीवरील विसर्जन घाटांची पाहणी भारतीय जनता पार्टी पिंपरी-चिंचवड शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे यांनी केली. या पाहणीस आरोग्य विभाग, स्थापत्य विभागाचे तसेच विद्युत विभाग अधिकारी आणि संबंधित कर्मचारी उपस्थित होते.



शत्रुघ्न काटे यांनी गणेश भक्तांच्या सुरक्षिततेसाठी सर्वंकष उपाययोजना करण्याच्या स्पष्ट सूचना दिल्या. त्यामध्ये घाटावर सुरक्षिततेच्या दृष्टीने निगराणी ठेवण्यासाठी CCTV कॅमेरे बसविणे, प्रत्येक विसर्जन घाटावर विसर्जनासाठी येणाऱ्या गणेश भक्तांसाठी गणपती आरती करण्याची व्यवस्था करणे, घाटावर आवश्यक अशी विद्युत दिवे लावणे,गणेश मूर्ती विसर्जनासाठी तयार करण्यात आलेल्या कृत्रिम हौदाची रंगरंगोटी करून स्वच्छ व नीटनेटके करणे, अत्यावश्यक सेवेसाठी 24 तास एक रुग्णवाहिकेची व्यवस्था, सुरक्षारक्षक नेमणे तसेच विसर्जन घाटावर नियमितपणे एक बचाव पथकाची नेमणूक करणे यांसारख्या उपायांचा विशेषतः उल्लेख करण्यात आला.



# मोशी मध्ये 'मंगळागौर'चा उत्साह शिगेला

## लक्षवेध स्पोर्टस् फाऊंडेशनतर्फे मंगळागौर खेळ, सखी महोत्सव उत्साहात

**पिंपरी | प्रतिनिधी**

घागर घुमू दे, सकडे ग बाई सकडे, पिंगा ग पोरी पिंगा, दिंड्या मोड गं पोरी यासारख्या गाण्यांवर महिलांनी केलेले मंगळागौर चे खेळ अनुभवण्याची संधी मोशीकरांना मिळाली. निमित्त होते मंगळागौर स्पर्धेचे. फुगडी, झिम्मा, सासू सूनेचे भांडण, पिंगा, आट्या-पाट्या यासारखे अनेक खेळ पाहण्याची संधी यावेळी उपस्थितांना मिळाली.

श्रावण महिन्याचे औचित्य साधून महिलांसाठी, महाराष्ट्राची खास ओळख असलेल्या पारंपरिक मंगळागौर स्पर्धेचे आयोजन लक्षवेध स्पोर्ट्स फाउंडेशनच्या अध्यक्षा प्रा. कविता आल्हाट यांच्या वतीने रविवारी 24 ऑगस्ट रोजी मोशीतील रामकृष्ण लॉन्स मध्ये करण्यात आले होते. पुरोगामी विचारधारा पुढे घेऊन जाण्याचा संकल्प करत सध्याच्या दैनंदिन धकाधकीच्या जीवनात मंगळागौर पूजन हळूहळू कालबाह्य होत चालले आहे. ही संस्कृती जतन करून ठेवण्यासाठी राष्ट्रवादीच्या शहराध्यक्षा प्रा. कविता अल्हाट यांनी पुढाकार घेतला होता.

या मंगळागौर उत्साहामध्ये विविध खेळ खेळण्याची परंपरा जतन करीत महिलांनी वटवाघूळ फुगडी, बस फुगडी, तवा फुगडी, फिंगरी फुगडी, वाकडी फुगडी, आगोटापागोटा, साळुंकी, गाठोडे, करवंटी झिम्मा, टिपऱ्या, गोफ, सासू-सून भांडण, अडवळ घुम पडवळ घुम, सवतीचे भांडण, दिंड, घोडा यासारख्या पारंपरिक खेळांबरोबर लाट्या बाई लाट्या, फू बाई फू, अठूडं केलं गठूडं अशी प्रचलित गाणी म्हणत वेगवेगळ्या गाण्यांनी हा खेळ रंगत गेला. मंगळागौरीचे खेळ खेळताना स्त्रिया या गाणी म्हणत सूप फिरवत नाचत फुगड्या, लाटण्याचे खेळत एकाहून एक सरस गाण्यावर नृत्य करीत फुगड्या घालत एकमेकींचा उत्साह वाढवताना दिसल्या. महिलांची वेशभूषा मराठमोळी तसेच भावणारी होती. नऊवारी साडी नेसून नाकात नथ आणि पारंपरिक दागिने घालून महिला सहभागी झाल्या होत्या.







सहभागी महिलांनी आपली पारंपारिक संस्कृती जपवणूक करून वेगवेगळ्या वेशभूषा परिधान करून मंगळागौर सादर केली. त्याचबरोबर मजेशीर उखाने, घेऊन हास्यकल्लोळ करीत कार्यक्रम पार पडला पारंपारिक खेळाबरोबर महिलांच्या सक्षमीकरणाचा संदेश देखील या कार्यक्रमात देण्यात आला मंगळागौर कार्यक्रमात उत्कृष्ट, नृत्य, गायन, कला खेळ पैठणीचा सादर करणाऱ्या महिलांना आकर्षित बक्षीस देऊन सन्मान करण्यात आला.कार्यक्रमाला मोठ्या संख्येने महिला देखील उपस्थित होत्या.

विशेष आकर्षण म्हणून वैभव तत्त्ववादी, प्राजक्ता गायकवाड , सूत्रसंचालक ओम यादव होते.

यावेळी खासदार सुनील तटकरे, महिला आयोगाच्या अध्यक्ष रूपाली चाकणकर, माजी आमदार विलास लांडे, माजी शहराध्यक्ष अजित गव्हाणे , माजी विरोधी पक्षनेते नाना काटे, प्रिया बनसोडे, माजी नगरसेवक वसंत बोराटे, राष्ट्रवादीचे शहर उपाध्यक्ष अतिष बारणे, युवा नेते विशाल आहेर, अॅड. विशाल जाधव, गणेश सस्ते, संदेश आल्हाट, निलेश जाधव, प्रकाश गव्हाणे, संतोष सस्ते, संगीता आहेर, वंदना जाधव यांच्यासह इतर कार्यकर्ते, मित्रपरिवार यावेळी उपस्थित होते. या मंगळागौर उत्सवाला सुमारे तीन हजार महिलांनी उपस्थिती दर्शविली.

खासदार सुनील तटकरे यांनी मंगळागौर उत्सवामधील महिलांचा सहभाग, कार्यक्रमाचे नियोजन याबद्दल प्रा. कविता आल्हाट यांचे कौतुक केले. प्रा. कविता आल्हाट यांचे काम चांगले असून, त्यांना चांगल्या कामाचे फळ निश्चित मिळेल असेही तटकरे यांनी सांगितले.

महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर यांनी राष्ट्रवादीच्या शहराध्यक्षा प्रा. कविता आल्हाट यांच्या पाठीवर कौतुकाची थाप मारली. महिला संघटनाबद्दल, कार्यक्रमाच्या नियोजनाबद्दल गौरवद्गार काढले.

# चिखलीतील मोई फाट्याजवळ रस्त्यांची दुरावस्था; दुचाकीस्वार घसरले

## रस्त्यांची दुरुस्ती तत्काळ करावी अन्यथा रास्ता रोको; स्थानिकांचा इशारा

**पिंपरी | प्रतिनिधी**

देहू-आळंदी रस्त्यावरील मोई फाट्याच्या समोरील बाजूस (मजूर अड्डयाच्या ) बाजूला रस्त्यावर मोठ-मोठे खड्डे पडले आहेत. त्या ठिकाणी सिग्नल लागले जाते, कोंडी अन् खड्ड्यातून गाडी काढताना वाहनचालकांना मोठी कसरत करावी लागते. मागील दोन आठवड्यापूर्वी दोन दुचाकीस्वारांचा त्या ठिकाणी अपघात झाला. या रस्त्यांची दुरुस्ती तत्काळ करावी अन्यथा रास्ता रोको करण्याचा इशारा स्थानिकांनी दिला आहे.





कुदळवाडीकडे जाणाऱ्या रस्त्यावर सुरुवातीलाच मोठ-मोठे खड्डे पडले आहेत. दिवसरात्र या रस्त्यावरून मोठ्या प्रमाणात वाहतूक सुरु असताना, वाहनधारक व पादचारी यांना अपघाताची भिती आहे. याशिवाय परिसरातील ड्रेनेज लाईन तुंबलेली असून, त्यातून दुर्गंधीयुक्त मैलामिश्रित पाणी रस्त्यावर साचलेले आहे. स्ट्रॉमवॉटर लाईनमधून होणाऱ्या गळतीमुळे रस्ता अधिकच खराब अवस्थेत आहे. रस्त्याचे कडेला मोठे चर पडले आहेत. रस्त्यावर खडी, माती साफ करणे आवश्यक आहे. स्थानिक नागरिकांनी महापालिका प्रशासनाकडून तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली आहे.

> रस्त्यावरील खड्डे तातडीने बुजवावेत. ड्रेनेज लाईनची तातडीने स्वच्छता करावी. स्ट्रॉमवॉटर लाईनमधील लिकेज थांबवावे. रस्त्याच्या कडेला साचलेली माती, खडी साफ करावी. मोई फाट्यावरील रस्त्याच्या दुरावस्थेमुळे आमच्या दैनंदिन जीवनात प्रचंड अडथळे येत आहे.
>
> **- दिनेश यादव, स्थानिक.**

> या रस्त्यावरून आम्हाला ये-जा करावी लागते. रस्त्याच्या सुरुवातीलाच मोठ-मोठे खड्डे, खडी, माती, ड्रेनेजचे रस्त्यावर पाणी यामुळे ये-जा करताना अपघाताची भिती मोठी आहे. मागील दोन आठवड्यापूर्वी आमच्या मागच्या सोसायटीतील ताई दुचाकीवरून घरसून पडल्या त्यांना दुखापत झाली. महापालिका प्रशासन अपघाताची वाट पाहतेय का? वाहतूकीचे रस्ते तातडीने दुरुस्त केले पाहिजेत.
>
> **- कुंदन गायकवाड, माजी नगरसेवक.**

> पावसामुळे रस्त्यावरील खड्ड्यांचे काम करता आले नाही. पाऊस थांबला की, तत्काळ काम केले जाईल. पावसामुळे खड्डे दुरुस्ती, डांबरीकरण करता येत नाही.
>
> **- विजय वायकर, फ क्षेत्रीय कार्यालय, स्थापत्य विभाग.**

# गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर वाहतुकीत मोठा बदल

## महत्त्वाच्या रस्त्यावर अवजड वाहनांना 24 तास बंदी; पोलीस यंत्रणादेखील सज्ज

**पुणे | प्रतिनिधी**

गणेशोत्सवाला 2 दिवस शिल्लक आहेत. संपूर्ण राज्यात गणेशोत्सव मोठ्या उत्साहात साजरा केला जाईल. या दरम्यान कायदा सुव्यवस्था राखण्यासाठी पोलीस यंत्रणादेखील सज्ज आहे. दरम्यान गणेशोत्सव काळासाठी पुणे शरह वाहतूक पोलीसांकडून शहरातील वाहतूक व्यवस्थेत मोठा बदल करण्यात आला आहे. तसेच, मध्यवर्ती भागात दिनांक २५.०८.२०२५ रोजी पासून ते.०७.०९.२०२५ पर्यंत महत्त्वाचे रस्त्यांवर अवजड वाहनांना २४ तास बंदी घालण्यात आली आहे.



दिनांक २७/०८/२०२५ व ०६/०९/२०२५ रोजी श्री. गणेशाची प्रतिष्ठापना निमित्त गणेश भक्त व मंडळे सकाळी ०६.०० ते १२ .०० वा. पर्यंत गणेश मुर्ती खरेदी करीत असतात. गणेश मुर्ती विक्रीचे बहुसंख्य स्टॉल हे डेंगळे पुल ते शिवाजी पुलाचे दरम्यान श्रमिक भवन समोर (आण्णाभाऊ साठे चौक) कसबापेठ पोलीस चौकी ते जिजामाता चौक ते मंडई, सावरकर पुतळा ते समाधान भेळ सेंटर (सिंहगड रोड) तसेच कुंभारवाडा, केशवनगर मुंढवा येथे आहेत.

या परीसरातील नागरीकांची गैरसोय तसेच वाहतूकीची कोंडी टाळण्यासाठी मोटार वाहन कायदा कलम ११५.११६(१) (ए) (बी), ११६ (४) आणि ११७ अन्वयेनुसार अत्यावश्यक सेवेतील वाहने (उदा. फायरब्रिगेड, पोलीस वाहने, रुग्णवाहिका इ.) खेरीज करुन आवश्यकतेनुसार दिनांक २५/०८/२०२५ ते २७/०८/२०२५ रोजी सकाळी ०६.०० ते रात्री रात्री उशिरा १२ पर्यत आवश्यकतेप्रमाणे वाहतुकीत बदल करण्याचे आदेश वाहतूक पुणे पोलीस उप आयुक्त हिंमत जाधव यांनी दिले आहेत.

**वाहतूक सुरु असलेले रस्ते :**

खालील नमुद मार्गावरुन सर्व प्रकारच्या वाहनांकरीता (जड वाहनांना प्रवेश बंदी) एकेरी वाहतूक सुरु राहील.

१. फडके हौद चौक ते जिजामाता चौक ते फुटका बुरुज

२. आप्पा बळवंत चौक ते बुधवार चौक ते मोती चौक

३. मंगला टॉकिज समोरील प्रिमीयर गॅरेज लेन मधूनकुंभारवेस

### मध्यवर्ती भागात जड वाहनांना बंदी

» दिनांक २५.०८.२०२५ रोजी पासून ते ०७.०९.२०२५ पर्यत गणपती विसर्जना पर्यंत खालील नमुद रस्त्यांवर जड / अवजड वाहनांना वाहतूकीस २४ तास बंदी घालण्यात आली आहे.

१) शास्त्री रोड सेनादत्त चौकी चौक ते अलका चौक
२) टिळक रोड जेधे चौक ते अलका चौक
३) कुमठेकर रोड शनिपार ते अलका चौक
४) लक्ष्मी रोड संत कबीर चौक ते अलका चौक
५) केळकर रोड फुटका बुरुज ते अलका चौक
६) बाजीराव रोड पुरम चौक ते गाडगीळ पुतळा
७) शिवाजी रोड गाडगीळ पुतळा ते जेधे चौक
८) कर्वे रोड नळस्टॉप चौक ते खंडोजीबाबा चौक
९) फर्ग्युसन कॉलेज रोड खंडोजीबाबा चौक ते विर चाफेकर चौक
१०) जंगली महाराज रोड स.गो. बर्वे चौक ते खंडोजीबाबा चौक
११) सिंहगड रोड राजाराम ब्रिज ते सावरकर चौक
१२) गणेश रोड / मुदलियार रोड पॉवरहाऊस दारुवाला- जिजामाता चौक फुटका बुरुज चौक

# कोकणवासियांसाठी पुण्यातून 170 ज्यादा बस

## स्वारगेट, पिंपरी, तळेगाव आगारातून धावणार; प्रवाशांची गर्दी आणि गैरसोय टाळण्यास मोठी मदत

**पुणे | प्रतिनिधी**

यंदाच्या गणेशोत्सवासाठी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या पुणे विभागातून कोकणासाठी 170 जादा गाड्या सोडण्याचा निर्णय घेतला आहे. या गाड्या पुणे, पिंपरी आणि तळेगाव आगारातून धावणार आहेत. यामुळे गणेशोत्सवादरम्यान होणारी प्रवाशांची गर्दी आणि गैरसोय टाळण्यास मोठी मदत होणार आहे.






गणेशोत्सव जवळ आल्यामुळे कोकणात जाणाऱ्या कोकणवासियांना ओढ लागते, ती आपल्या गावी जाण्याची, गणेशोत्सवासोबतच कोकणात होळीचा सणदेखील मोठ्या उत्साहाने साजरा केला जातो. या दोन्ही सणांच्या दिवशी मुंबई, पुण्यात कामधंद्यासाठी गेलेले कोकणवासिय आवर्जून सुट्ट्या काढून आपल्या गावी कोकणात जातात

त्यामुळे या सणांच्या काळात रेल्वे आणि एसटी गाड्यांना मोठी गर्दी होत असते. त्या पार्श्वभूमीवर एसटीच्या पुणे विभागाने गणेशोत्सवानिमित्त नियोजित गाड्यांव्यतिरिक्त 170 जादा गाड्या कोकण भागातील प्रवाशांसाठी सोडल्या आहेत.

गणेशोत्सवानिमित्त कोकणात गावी जाणाऱ्या भाविकांची संख्या जास्त असते. त्यामुळे दरवर्षी मध्य रेल्वेकडून गणेशभक्तांसाठी जादा गाड्या सोडण्यात येतात. यंदाही कोकणवासियांसाठी मध्य रेल्वे पुणे विभागाने जादा गाड्या सोडल्या आहेत. पुणे विभागातून नियोजित गाड्यांव्यतिरिक्त सहा विशेष गाड्या धावणार आहेत. त्यांच्या प्रत्येकी दोन म्हणजेच एकूण 12 फेऱ्या होणार आहेत. यागाड्यांद्वारे पुणे-रत्नागिरीदरम्यान कोकणवासियांना प्रवास करतायेणार आहे.

याबाबत मध्य रेल्वे पुणे विभागाचे विभागीय वाणिज्य अधिकारी तथा जनसंपर्क अधिकारी हेमंत कुमार बेहरा म्हणाले, दिनांक 23 ऑगस्टपासून आम्ही गणेशोत्सव गाड्या सोडायला सुरूवात केली आहे. दि. 23, 26 आणि 30 रोजी तीन विशेष गाड्या धावतील यांच्या प्रत्येकी सहा फेऱ्या होतील. तसेच, दि. 2, 6 आणि 9 सप्टेंबर 2025 रोजी सहा फेऱ्या पुणे-रत्नागिरी-पुणे दरम्यान होतील, अशा एकूण 12 फेऱ्या गणेशोत्सव स्पेशल गाड्यांच्या होणार आहेत. या सेवेचा प्रवाशांनी लाभ घ्यावा.

### रेल्वेच्या 12 विशेष फेऱ्या

» मध्य रेल्वे रेल्वेच्या पुणे विभागाकडून कोकणात जाणाऱ्या भाविकांसाठी सहा विशेष जादा गाड्यांचे नियोजन करण्यात आले आहे. या गाड्यांच्या पुणे-रत्नागिरी-पुणेदरम्यान एकूण 12 फेऱ्या होणार आहेत. यामुळे रेल्वेने कोकणात ये-जा करणाऱ्या प्रवाशांना दिलासा मिळणार आहे.

“ गणेशोत्सवात कोकणात जाणाऱ्या प्रवाशांची संख्या मोठी असते. त्यामुळे आम्ही दरवर्षी जादा गाड्यांचे नियोजन करतो. यंदाही पुणे विभागातून 170 जादा गाड्या सोडण्यात येणार आहेत. या गाड्या स्वारगेट, पिंपरी आणि तळेगाव आगारातून उपलब्ध असतील. याव्यतिरिक्त, मुंबई आणि ठाणे विभागाच्या मागणीनुसार, त्यांना 230 गाड्या पुरवण्यात आल्या आहेत. गरज पडल्यास आणखी गाड्या उपलब्ध करून दिल्या जातील.

**- कमलेश धनराळे, विभागीय वाहतूक अधिकारी, एसटी, पुणे**

# पक्ष फोडा, घर फोडा,आता प्रभाग फोडा

## राज्य सरकारचे फोडाफोडेची राजकारण; खासदार सुप्रिया सुळेंची टीका

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे महापालिकेच्या प्रारूप प्रभाग रचनेबाबत सत्तेतील काही पक्षासह अन्यपक्षामध्ये असवस्था आहे. जे काही ते पारदर्शकपणे व्हावे. कुठल्याही राजकीय दबावाखाली होउ नये . एकाला सोयीप्रमाणे प्रभाग रचना करू नका. नागरिक केंद्रबिंदु असला पाहिजे. निवडणुक जिकणे हा केंद्रबिदु कसा असु शकतो. ताकदवर लोकांनी उत्तम काम केले. त्यांचेच प्रभाग फोडले आहेत. ही मनमानी आहे. पक्ष फोडा, घर फोडा,आता प्रभाग फोडा. नुसते फोडाफोडेची राजकारण राज्यसरकार करत असल्याची टिका खासदार सुप्रिया सुळे यांनी पत्रकाराशी बोलताना केली.



शहरातील विविध प्रश्नाबाबत पुणे महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांच्यासह विविध अधिका०याबरोबर खासदार सुप्रिया सुळे यांनी बैठक घेतली. यावेळी राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार गटाचे शहराध्यक्ष प्रशांत जगताप, सचिन दोडके यांच्यासह विविध पदाधिकारी उपस्थित होते. त्यानंतर सुप्रिया सुळे पत्रकारशी बोलत होत्या.

प्रारूप प्रभाग रचनेवरील हरकती आणि सुचनासाठी ४ सप्टेबर मुदत दिली आहे. पण गणेशोत्सवाचा कालावधी आला आहे. त्यामुळे हरकती आणि सुचनासाठी १० स्टेंबर पर्यत मुदत दयावी अशी मागणी राज्य निवडणुक आयोगाकडे करणार आहे. त्यासाठी पत्र ही देणार आहे. महापालिकेची निवडणुक ही कार्यकत्याची निवडणुक आहे. त्यामुळे कार्यकत्याच्या पाठीमागे सर्वाना उभे राहिले पाहिजे. एकाला सोयीप्रमाणे प्रभाग रचना करू नका. नागरिक केंद्रबिंदु असला पाहिजे. निवडणुक जिकणे हा केंद्रबिदु कसा असु शकतो. ताकदवर पुणे आणि मुंबईत लोकांनी उत्तम काम केले. त्यांचेच प्रभाग फोडले आहेत. ही मनमानी आहे. राज्याच्या सत्तेतील सर्वात मोठा पक्षाने अन्याय केला आहे. सत्तेतील काही पक्षानी त्यावर नाराजी व्यक्त केली आहे. अन्याया विरोधात बोलणे ही नैतीक जबाबदारी आहे. कायदयानसार प्रभाग रचना झाली पाहिजे. मुख्यमंत्री देवेद्र फडणवीस यांनी एका खात्यावर नाराजी व्यक्त केल्याचे खासदार सुप्रिया सुळे यांनी सांगितले.

### लाडकी बहिण योजनेतील भ्रष्टाचाराबाबत जनहित याचिका दाखल करणार

**» लाडकी बहिण योजनेतील साफटवेअरमध्ये पुरूष आणि स्त्री कळले नाही का असा सवाल करून सुप्रिया सुळे म्हणाल्या, या योजनेत ४ हजार ८०० कोटीचा घोटाळा झाला आहे. त्यामुळे या योजनेच्या भ्रष्टाचाराबाबत जनहित याचिका दाखल करणार आहे. राज्यातील महायुतीच्या सरकारच्या काळात दर तीन तासला एक शेतकरी आत्महत्या करत आहेयाकडेही त्यांनी लक्ष वेधले.**

# पावसाच्या उघडिपीनंतर फळभाज्यांची मोठी आवक

## गाजर महागले; उर्वरित सर्व फळभाज्यांचे भाव टिकून; तरकारी विभागात 100 ट्रकमधून शेतमाल दाखल

**पुणे | प्रतिनिधी**

पावसाने उघडीप दिल्यानंतर शेतकऱ्यांनी शेतमालाची मोठ्या प्रमाणात तोड करून शेतमाल बाजारात विक्रीसाठी पाठविला. परिणामी, गुलटेकडी मार्केट यार्डातील तरकारी विभागात रविवारी राज्याच्या विविध भागांसह परराज्यांतून सुमारे 100 ट्रक फळभाज्यांची आवक झाली. बाजारात दाखल झालेल्या मालाला अपेक्षित उठाव राहिला नाही.

गाजर वगळता सर्व फळभाज्यांचे भाव गत आठवड्याच्या तुलनेत स्थिर राहिले. मागणीच्या तुलनेत आवक कमी असल्यामुळे गाजराच्या भावात दहा टक्क्यांनी वाढ झाल्याचे सांगण्यात आले.

परराज्यांतून झालेल्या आवकमध्ये कर्नाटक, गुजरात, उत्तर प्रदेश येथून हिरवी मिरची 10 ते 12 टेम्पो, इंदौर येथून गाजर 9 ते 10 टेम्पो, कर्नाटक येथून कोबी 4 ते 5 टेम्पो, आंध्र प्रदेश आणि तामिळनाडू येथून शेवगा 4 ते 5 टेम्पो, कर्नाटक येथून पावटा 3 ते 4 टेम्पो, तामिळनाडू येथून तोतापुरी कैरी 50 क्रेटस, कर्नाटक येथून घेवडा 3 ते 4 टेम्पो, गुजरात येथून भुईमूग शेंग 4 ते 5 टेम्पो, मध्यप्रदेश येथून लसणाची सुमारे 9 ते 10 टेम्पो तर इंदौर, आग्रा, स्थानिक भागातून बटाटा 30 ते 35 टेम्पो इतकी आवक झाली होती.

स्थानिक भागातून झालेल्या आवकमध्ये सातारी आले सुमारे 400 ते 500 गोणी, भेंडी 5 ते 6 टेम्पो, गवार 4 ते 5 टेम्पो, टोमॅटो 10 हजार क्रेटस, हिरवी मिरची 3 ते 4 टेम्पो, काकडी 7 ते 8 टेम्पो, फ्लॉवर 10 टेम्पो, कोबी 7 ते 8 टेम्पो, ढोबळी मिरची 10 ते 12 टेम्पो, शेवगा 2 ते 3 टेम्पो, भुईमुंग शेंग 125 गोणी, मटार 500 ते 600 गोणी, तांबडा भोपळा 10 ते 12 टेम्पो, कांदा सुमारे 100 ट्रक इतकी आवक झाली.



**पालेभाज्यांच्या मागणीत वाढ**

मार्केट यार्डात पालेभाज्यांची आवक मागील आठवड्याच्या तुलनेत स्थिर आहे. पावसाने उघडीप दिल्यानंतर पालेभाज्यांना मागणी वाढली आहे. तरीही मेथी वगळता सर्व पालेभाज्यांचे भाव मागील आठवड्याच्या तुलनेत स्थिर आहेत. मेथीच्या भावात मात्र मागील आठवड्याच्या तुलनेत भावात 10 टक्क्यांनी वाढ झाली आहे. घाऊक बाजारात मेथीच्या जुडीला दर्जानुसार 12 ते 20 रुपये भाव मिळत आहे. येथील घाऊक बाजारात रविवारी (दि. 24) कोथिंबिरीची सुमारे 1 लाख 50 हजार जुडी, तर मेथीची 80 हजार जुडींची आवक झाली होती. ही आवक मागील आठवड्याच्या तुलनेत स्थिर आहे.